# शिवाजी विद्यापीठामध्ये 'रिमोट सेन्सिंग'वर मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोलशास्त्र अधिविभाग आणि कला, विज्ञान व वाणिज्य सरकारी महाविद्यालय, मार्शेल (गोवा) यांच्यावतीने 'रिमोट सेन्सिंग अँड जीआयएस विथ ॲडवान्सड सर्व्हे टेक्नॉलॉजी' या विषयावरील सात दिवसीय कार्यशाळा दि. १८ ते २४ नोव्हेंबरदरम्यान पार पडली.

कार्यशाळेमध्ये रिमोट सेन्सिंगचा परिचय, जीआयएसची ओळख, क्यूजीआयएस सॉफ्टवेअर ओळख, डेटा मॉडेल, डिजिटायझेशन आणि टोपोलॉजी, भूप्रदेश विश्लेषण, आदींचा समावेश होता. डॉ. पी. टी. पाटील, विद्या चौगुले, अभिजित पाटील, सुधीर पोवार या सहायक प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले. उद्घाटन भूगोल अधिविभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले. प्रा. डॉ. प्रबीर कुमार रथ हे प्रमुख उपस्थित होते. प्रा. डॉ. संभाजी शिंदे हे संयोजक होते. पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप झाला.

# पदवी प्रमाणपत्र अर्जासाठी मुदतवाढ

## शिवाजी विद्यापीठ : दीक्षान्त विभागाकडे ५४ हजार अर्ज दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तांत्रिक अडचण आणि पुनर्मूल्यांकनाचे निकाल उशिरा जाहीर झाल्याने काही विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करता आले नव्हते. हे लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने या विद्यार्थ्यांसाठी पदवी प्रमाणपत्राकरिता अर्ज करण्यासाठी अतिविलंब शुल्क आणि आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करण्याची मुदत मंगळवार (दि. ३ डिसेंबर)पर्यंत वाढविली आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करून त्याची प्रत शनिवार (दि. ७ डिसेंबर)पूर्वी विद्यापीठातील दीक्षान्त विभागामध्ये जमा करायची आहे.

विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभामध्ये प्रदान केल्या जाणाऱ्या पदवी प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांना ८ नोव्हेंबरपर्यंत अतिविलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन विद्यापीठाने दि. २६ ऑगस्टला केले होते. या मुदतीत दीक्षान्त विभागाकडे ५४ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज दाखल झाले आहेत. पीएच. डी. अभ्यासक्रम वगळता अन्य अभ्यासक्रमाच्या पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची ऑनलाईन लिंक बंद झाली आहे; मात्र, तांत्रिक अडचण, पुनर्मूल्यांकनाचे उशिरा लागलेले निकाल आणि ऑनलाईन अर्ज भरला; पण शुल्क अदा केलेले नाही, अशा विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत वाढविण्याचा निर्णय घेतला. पीएच. डी. प्राप्त विद्यार्थ्यांना दि. ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहेत. अतिविलंब शुल्कासह या विद्यार्थ्यांना दि. ३ डिसेंबरपर्यंत अर्ज करता येईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

लोकमत

आदित्य वेल्हाळ




शिवाजी विद्यापीठात मंगळवारी सायंकाळी मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्यावतीने कॅंडल मार्च काढण्यात आला.

लोकमत

# कँडल मार्चद्वारे शहिदांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी सायंकाळी मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्यावतीने कँडल मार्चद्वारे आदरांजली वाहण्यात आली.

मुलींच्या बसतिगृहापासून सायंकाळी सहा वाजता कँडल मार्च सुरु झाला. मुख्य इमारतीसमोर मेणबत्ती प्रज्वलित करुन शहिदांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ज्ञानस्रोत केंद्राच्या समन्वयक डॉ. नमिता खोत, डॉ. ए. एम. गुरव, शिवाजी जाधव, आदी उपस्थित होते.

कुलगुरु म्हणाले, कँडल मार्च उपक्रमातून देशभक्तीची भावना जागृत होते. त्यासह एकसंघ राहण्याची प्रेरणा आम्हाला मिळते. पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. सुमेधा साळुंखे, अनुराधा इनामदार, सुधाकर बर्गे, आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

Hello Kolhapur
Page No. 1 Nov 27, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

## कुलगुरु चषक क्रिकेट स्पर्धा : शिवाजी विद्यापीठ, जामिया मिलीया युनिव्हर्सिटीचे आव्हान संपुष्टात

# दयानंद, पंजाबीसह चार संघ उपांत्य फेरीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कुलगुरु चषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रतिस्पर्धी संघांवर मात करत महर्षी दयानंद विद्यापीठ रोहतक, पंजाबी युनिव्हर्सिटी पटियाला, जम्मू युनिव्हर्सिटी आणि हिस्सारमधील लाला लजपतराय युनिव्हर्सिटीने मंगळवारी उपांत्य फेरीत प्रवेश केला. शिवाजी विद्यापीठ, दिल्लीच्या जामिया मिलीया इस्लामिया युनिव्हर्सिटी, लुधियानाच्या पंजाब ॲग्रीकल्चर युनिव्हर्सिटी आणि चंदीगढच्या पंजाब युनिव्हर्सिटीचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

येथील पॅव्हेलियन क्रीडांगणावरील उपांत्यपूर्व फेरीतील पहिल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठाने २० षटकांत चार बाद ११६ धावा केल्या. त्यात सागर पवार यांनी सर्वाधिक २७ धावा केल्या. या संघातील विशाल हिलगे आणि रमेश ढोणुक्षे यांनी प्रत्येकी २३ धावा केल्या. रोहतक विद्यापीठाच्या नरेंद्रकुमार यांनी तीन, तर दीपककुमार यांनी एक बळी घेतला. उत्तरादाखल खेळताना रोहतक विद्यापीठाने १५.२ षटकांत तीन बाद ११७ धावा करत उपांत्य फेरीत प्रवेश केला.

गोलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठाच्या विश्वनाथ वरुटे यांनी तीन बळी घेतले. त्यांनी या स्पर्धेत एकूण १६ बळी घेत दोनवेळा हॅट्‌ट्रिक नोंदविली. दुसऱ्या सामन्यात पंजाबी युनिव्हर्सिटीने जामिया युनिव्हर्सिटीवर पाच गडी राखून मात केली. त्यामध्ये प्रथम फलंदाजी करताना जामिया युनिव्हर्सिटीने १९.३ षटकांत १० बाद १२१ धावा केल्या.

त्यांच्या वाहीद यांनी २७, आदिल २९, अखलाक १९, तर वजहात यांनी नाबाद १२ धावा केल्या. पंजाबी युनिव्हर्सिटीकडून परमिंदरसिंह यांनी तीन, गुरप्रित आणि हरप्रित यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना पंजाबी युनिव्हर्सिटीने १८.२ षटकांमध्ये पाच बाद १२२ धावांनी विजय मिळविला.

त्यांच्या प्रीतपालसिंह यांनी नाबाद ५७, गुरुप्रितसिंह १९, पंकज यांनी १७ धावा केल्या. गोलंदाजी करताना जामिया युनिव्हर्सिटीच्या वझहत खान यांनी दोन आणि फरीद, अखक्क, सरफराज यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. ॲथलेटिक्स मैदानावरील पहिल्या सामन्यात जम्मू युनिव्हर्सिटीने पंजाब ॲग्रीकल्चर युनिव्हर्सिटीवर तीन गडी राखून विजय मिळविला. त्यात 'पंजाब'चा १८.२ षटकांत सर्वबाद १५३ धावांवर खेळ आटोपला. उत्तरादाखल खेळताना 'जम्मू'ने १७.११ षटकांत सात बाद १५५ धावा करत बाजी मारली. दुसऱ्या सामन्यात लाला लजपतराय युनिव्हर्सिटीने पंजाब युनिव्हर्सिटीवर सहा गडी राखून उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यामध्ये 'पंजाब'ने २० षटकांमध्ये सात बाद १९८ धावांची खेळी केली. लजपतराय युनिव्हर्सिटीने १९.५ षटकांत चार बाद १९९ धावा करून विजय मिळविला.

### मॅाटिसिंग सामनावीरचा मानकरी

नाबाद ५७ धावा करणारे आणि दोन बळी घेणारे पंजाबी युनिव्हर्सिटीचे मॅाटीसिंग यांनी त्यांच्या वाढदिनी 'सामनावीर'चा किताब पटकाविला. अन्य तीन सामन्यांमध्ये नरेंद्र कुमार (रोहतक विद्यापीठ), सुमित शर्मा (जम्मू युनिव्हर्सिटी), अनिलकुमार (लजपतराय युनिव्हर्सिटी) सामनावीर ठरले.

### पटियालाच्या 'परमिंदर' यांची हॅट्‌ट्रिक

जामिया युनिव्हर्सिटीविरुद्धच्या सामन्यात गोलंदाजी करताना पटियाला युनिव्हर्सिटीच्या परमिंदर यांनी तीन बळी घेत हॅट्‌ट्रिक केली. त्यासह त्यांच्या संघातील प्रितपाल यांनी नाबाद ५७ धावांची विजयी खेळी केली. रोहतक विद्यापीठाच्या नरेंद्र कुमार यांनी ३२ धावा केल्या आणि तीन बळी घेतले.

अमित गद्रे




**२६ नोव्हेंबरच्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना अभिवादन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागातर्फे करण्यात आलेल्या कँडल मार्चमध्ये सहभागी विद्यार्थी**

# विद्यापीठाच्या प्रांगणात शहिदांच्या स्मृतिज्योती

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

मुंबई येथे २६ नोव्हेंबर २००८ ला झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील शहीदांना आदरांजली अर्पण करण्यासाठी पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठात मंगळवारी सायंकाळी कॅन्डल मार्चचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कुलगुरु डॉ, देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. नमिता खोत, व्ही टी. पाटील उपस्थित होते.

यावेळी या हल्ल्यातील निष्पाप नागरिकांसह प्राणांची आहुती दिलेल्या शहीदांसाठी ज्योत प्रज्वलित करून त्यांच्या स्मृती जपण्यात आल्या. पत्रकारिता आणि एम. ए. मास कम्युनिकेशनचे विद्यार्थी गेल्या सात वर्षांपासून हा उपक्रम राबवित आहेत. या कॅन्डल मार्चमध्ये विद्यापीठाच्या विविध विभागातील विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच अन्य नागरिक यांनी सहभाग घेतला.विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील बागेपर्यंत हा कॅन्डल मार्च काढण्यात आला. या ठिकाणी शहीद अधिकारी आणि जवानांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. वृत्तपत्र संवाद विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. शिवाजी जाधव यांनी संयोजन केले.

# लजपतराय विद्यापीठ, 'शिवाजी' विजयी

कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत यजमान शिवाजी विद्यापीठ संघासह लाला लजपतराय विद्यापीठाने विजय मिळवला.

पंजाब विद्यापीठाने लजपतराय विद्यापीठाविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना सात बाद १९८ धावा केल्या. अमरिंदर सिंगने ३५ चेंडूत नाबाद ७७ धावा केल्या. लजपतराय विद्यापीठाकडून सतबीर शर्माने तीन गडी बाद केले. पंजाब विद्यापीठाच्या धावाचा पाठलाग करताना लजपतराव विद्यापीठाने शेवटच्या षटकात पाचव्या चेंडूवर पार केली. सहा बाद १९९ धावा केल्या. अनिल कुमारने ७१ धावा केल्या. पंजाब विद्यापीठाच्या अमरिंदर सिंगने दोन गडी बाद केले.

दुसऱ्या सामन्यात पंजाबी विद्यापीठाने जामिया विद्यापीठावर पाच गड्यांनी मात केली. प्रथम फलंदाजी करताना जामिया विद्यापीठाने १२१ धावा केल्या. वाहिदने २७, अदीवनं २९. अखलाखने १९ धावा केल्या. परमिंदर सिंगने हॅट्ट्रिक केली

जामिया विद्यापीठाचे आव्हान पंजाबी विद्यापीठाने पाच गडी गमावून पार केली. प्रितपाल सिंहने नाबाद ५७ धावा केल्या. गुरुप्रितसिंहने १९ तर पकंजने १७ धावा केल्या. जामियाकडून वझहत खानने दोन तर फरिद, अखलम आणि सर्फराजने प्रत्येकी एक बळी मिळवला.

रोहतक विद्यापीठाने यजमान शिवाजी विद्यापीठावर सात गड्यांनी मात केली. शिवाजी विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना चार बाद ११६ धावा केल्या. सागर पवारने २७, विशाल हिरपन्नेने २३, रमेश ढोणुक्षेने २३ धावा केल्या. रोहतककडून नरेंद्र कुमारने तीन तर दीपक कुमारने एक बळी मिळवला.

रोहतक विद्यापीठाने तीन बाद ११७ धावा केल्या. नरेंद्र कुमारने ३२, दीपक कुमार ३२, गौरव कुमारने २३ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाकडून विश्वनाथ वरुटेने तीन बळी मिळवले.

Appasaheb.mali
@timesgroup.com
Tweet : Appasaheb_MT

# विद्यापीठात बहरली पक्षी-फुलपाखरांची दुनिया



**कोल्हापूर :** नानाविध प्रजातीच्या फुलझाडांनी बहरलेल्या आणि पश्चिम घाटातील दुर्मिळ वनस्पतींच्या बोटॅनिकल गार्डनमुळे वेगळेपण जपणाऱ्या शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पसमध्ये १३६ प्रजातींच्या पक्ष्यांचा किलबिलाट अन् ५९ जातीच्या फुलपाखरांच्या वास्तव्याने मनमोहक रंगीबेरंगी दुनियेची सैर घडते. पर्यावरणशास्त्र विभागाने कॅम्पसमधील पक्षी, फुलपाखरे, सरपटणाऱ्या प्राण्यांसह जैवविविधतेच्या नोंदी केल्या आहेत.

## १३६ प्रजातींचे पक्षी; ५९ जातींची फुलपाखरे

विविध प्रजातींचे पक्षी, फुलपाखरे, सस्तन व सरपटणाऱ्या प्राण्यांची छायाचित्रे, त्यांच्या वैशिष्ट्यांचा डाटा जमविला आहे. कॅम्पसमध्ये पंधरा प्रकारचे साप आढळतात, शिवाय कोल्हा हा वन्यजीव नजरेस पडल्याचे अभ्यासक सांगतात. विद्यापीठातील ही जैवविविधता अभ्यासकांसह नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे.

'नॅक' कमिटीतर्फे विद्यापीठाच्या होणाऱ्या मूल्यांकनाच्या पार्श्वभूमीवर कॅम्पसमधील जैवविविधतेची माहिती एकत्र केली जात आहे. यापूर्वी वनस्पतीशास्त्र विभागातर्फे वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती, फुलझाडींच्या अभ्यास आणि दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन सुरू आहे. लीड बोटॅनिकल गार्डनअंतर्गत कॅम्पसमध्ये पश्चिम घाटातील ११२० दुर्मिळ वनस्पतींचे संवर्धन केले आहे. औषधी व दुर्मिळ वनस्पती आणि अन्य प्रकारच्या जैवविविधतेची नोंद राष्ट्रीयस्तरापर्यंत पोहोचली आहे. हा परिसर फुलांनी बहरला आहे. कॅम्पसमध्ये ७६ प्रकारची फुले आढळतात. विशेषतः रानफुलांनी परिसराचे निसर्गसौंदर्य आणखी बहरले आहे. येथे कृष्णकमळही आढळले आहे. याशिवाय कॉसमॉस, अकेशिया, केना, कुर्डू, सनफ्लॉवर, मेक्सिकन अशा फुलांचा बहर दरवळत आहे. जास्वंदी, कर्दळ, गुलाबासह विविध प्रकारच्या रानफुलांनी कॅम्पसचे सौंदर्य खुलले आहे.

पर्यावरणशास्त्र विभागाने पक्षी, फुलपाखरे, सरिसृप प्राण्यांची माहिती संकलित केली आहे. यात काही पक्षी स्थलांतरित आहेत. गेली दोन वर्षे हे काम सुरू होते. परिसरातील उद्याने, तलावासह अन्य भागातील नोंदी करण्यात आल्या. यामध्ये पक्षी, फुलपाखरांची छायाचित्रे, त्यांची वैज्ञानिक नावे, त्या प्रजातींविषयीच्या अन्य माहितीचा समावेश आहे. विद्यापीठातील या जैवविविधतेवर पुस्तकाची निर्मिती करण्यात येणार आहे.

पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, डॉ. आसावरी जाधव, प्रा. डॉ. पल्लवी भोसले, संशोधक विद्यार्थी अमोल चौगले, एमएस्सीचे विद्यार्थी स्वप्नील असोदे, शुभम कुरुंदवाडकर आदींच्या टीमने ही माहिती संकलित केली. यामध्ये १३६ प्रकारचे पक्षी, ५९ प्रजातींची फुलपाखरे आढळली. सस्तन प्राण्यांमध्ये मुंगूस, घूस, उंदीर, खवल्या मांजरासह कोल्हासुद्धा नजरेस पडल्याचे अभ्यासकांनी सांगितले. तलावांत वेगवेगळ्या प्रकारची बदके आहेत. परिसरात मोरांचीही संख्या मोठी आहे. पंधरा प्रकारचे बेडूक आढळले आहेत.



पाणथळ परिसरातील पक्ष्यांचा नेहमी वावर असतो.





विद्यापीठातील दिसलेला पक्षी

### १५ जातींचे सर्प


विद्यापीठ परिसर वनस्पती, झाडांनी व्यापला असल्याने पक्षी, फुलपाखरांसाठी पोषक आहे. कॅम्पसमध्ये १५ जातींचे साप आढळल्याची नोंद आहे. यामध्ये नाग, फुरसे, घोणस, मण्यार हे विषारी सर्प आहेत. हिरवा साप हा विषारी समजला जातो. दहा बिनविषारी साप आहेत.

**"विद्यापीठ कॅम्पस जैवविविधतेने समृद्ध आहे. प्रशासनाने जैवविविधतेच्या जपणुकीला प्राधान्य दिले आहे. विविध वनस्पती, फुले, दुर्मिळ व औषधी वनस्पतींचे संवर्धन करून झाडांची निगा राखली जाते. पक्षी, फुलपाखरांसह अन्य प्रकारचे प्राणीही कॅम्पसमध्ये आढळतात. वनस्पती, फुले आणि पक्षी, फुलपाखरांची इतकी विपुलता असणे हे जैवविविधतेच्या समृद्धतेचे प्रतिक समजले जाते. ही जैवविविधता जपण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे.**

– **डॉ. पी. डी. राऊत,** विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र

### कॅम्पसमधील फुलपाखरु पक्षी वैभव

| | |
|---|---|
| १३६ | पक्ष्यांच्या प्रजाती |
| ५९ | फुलपाखरांच्या प्रजाती |
| १५ | प्रजातींचे सर्प |
| १४ | बेडूकांचे प्रकार |



**शुभवार्ता**

# बाबासाहेब आंबेडकर महान राष्ट्रनिर्माते

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



## डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांचे प्रतिपादन

'भारतीय संविधानाची निर्मिती करून भारतातल्या कनिष्ठ समजल्या गेलेल्या समाजाच्या मानेवर पारंपरिक व्यवस्थेने लादलेले गुलामगिरीचे जोखड भिरकावून देऊन नष्ट करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. संविधानामध्ये बाबासाहेबांनी भविष्यातील भारत कसा असेल, याचे दिग्दर्शन केले आहे. त्यांनी मांडलेले विचार विज्ञाननिष्ठ भारत घडवणारे आहेत. त्यामुळे ते महान राष्ट्रनिर्माते ठरतात', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे संविधान दिनानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान', या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

डॉ. मिरजकर म्हणाले, 'भारतीय राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी भारतात धर्मसूत्रे आणि मनुस्मृतीच्या नियमांमध्ये भारतीय समाजव्यवस्थेतील शासन, प्रशासन कसे चालेल, याची मांडणी केली होती. वैदिक परंपराचा पगडा तत्कालीन शासन व्यवस्थेवरही होता. ती व्यवस्था गुलामीची होती. संविधानाच्या निर्मितीमधून ही गुलामगिरी डॉ. आंबेडकर यांनी नष्ट केली.'

अध्यक्षीय भाषणात डॉ. महाजन म्हणाले, 'आपण आता संविधानिक नीतिमत्ता, संविधानिक भाषा आणि संविधानातील आशय, तत्त्वज्ञान व व्यवहार यांच्या संदर्भात स्पष्ट भूमिका घेऊन काम करावे लागणार आहे.' अविनाश भाले यांनी प्रास्ताविक आणि स्वागत केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. व्याख्यानास डॉ. पी.एस. कांबळे, डॉ. ए.बी. कांबळे, डॉ. के.डी. सोनवणे उपस्थित होते.

# कँडल मार्चद्वारे शहिदांना अभिवादन

## २६-११ च्या स्मृती; शिवाजी विद्यापीठात आयोजन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर मंगळवारी २६-११ मधील शहिदांना कँडल मार्चद्वारे श्रद्धांजली वाहिली.

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातर्फे २६-११ च्या हल्ल्यात शहीद झालेल्या संरक्षण दलाच्या अधिकारी आणि जवानांना कँडल मार्चद्वारे अभिवादन केले. या कँडल मार्चमध्ये विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर मेणबत्त्या प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले.

मुंबई शहरावर २६ नोव्हेंबर २०११ रोजी मोठा दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात शेकडो लोक मारले गेले. तर सुरक्षाबल, महाराष्ट्र पोलिस यांचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी यांना वीरमरण आले. गेल्या सात वर्षांपासून शिवाजी विद्यापीठात या दिवशी शहिदांना अभिवादन करण्यासाठी कँडल मार्चचे आयोजन केले जाते. विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहातून कँडल मार्चला सुरुवात झाली. हा मार्च विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर आला. या ठिकाणी शहिदांच्या प्रतिमेसमोर रांगोळी काढण्यात आली होती. हातामध्ये मेणबत्ती घेऊन विद्यार्थ्यांनी शहिदांना अभिवादन केले.

यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार-मुढे, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळोखे, अनुराधा इनामदार यांच्यासह विद्यार्थी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

» कुलगुरू चषक टी -२० क्रिकेट स्पर्धा

# रोहतक, पटियाला विद्यापीठ उपांत्य फेरीत

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठ येथे सुरू असणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी -२० क्रिकेट स्पर्धेत रोहतक विद्यापीठ, पटियाला विद्यापीठाने उपांत्य फेरीत प्रवेश केला, तर शिवाजी विद्यापीठाचे आव्हान उपांत्यपूर्व सामन्यातच संपुष्टात आले. आज झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यामध्ये रोहतक विद्यापीठ संघाने शिवाजी विद्यापीठ संघाचा ७ गाडी राखून पराभव केला.

सामन्यात रोहतक विद्यापीठाने नाणेफेक जिंकून फलंदाजीसाठी शिवाजी विद्यापीठ संघाला निमंत्रित केले. प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ संघाने निर्धारित २० षटकात पाच बाद ११६ धावा केल्या. यामध्ये सागर पवार २७, विशाल हिलगे २३, रमेश ढोणुक्षे २३ यांनी धावा केल्या. रोहतक विद्यापीठाकडून गोलंदाजी करताना नरेंद्र कुमार ३, तर दीपक कुमार याने १ बळी घेतला. उत्तरादाखल खेळताना रोहतक विद्यापीठाने १५.२ षटकात ३ गाड्यांच्या मोबदल्यात ११७ धावा करत हा सामना जिंकला. सामन्यात नरेंद्र कुमार ३२, दीपक कुमार ३२, गौरव कुमार याने २३ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठकडून विश्वनाथ वरुटे यांनी ३ गाडी बाद केले. पंजाबी पटियाला युनिव्हर्सिटीविरुद्ध जामिया विद्यापीठ दिल्ली यांच्यामध्ये झालेल्या सामन्यात पटियाला युनिव्हर्सिटीने ५ गाडी राखून विजय मिळवला. जामिया विद्यापीठाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत १९.३ षटकांत सर्वबाद १२१ धावा केल्या. यामध्ये वाहिद २७, आदिल २९, अखलाक १९, वजहात नाबाद १२ धावा केल्या. पटियाला पंजाब विद्यापीठाकडून परमिंदर सिंह ३, गुरप्रीत, हरप्रीत आणि प्रेम यांनी प्रत्येकी १ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना पटियाला पंजाब विद्यापीठाने १८.२ षटकात ५ बाद १२२ धावा केल्या. यामध्ये प्रितपाल सिंह याने नाबाद ५७, गुरप्रीत सिंह १९, पंकज १७ धावा केल्या.